### *Appendix IX (iv)*, (Vide Article - 9.01 (ix-c))

संजय गांधी राष्ट्रीय उद्यान बोरीवली येथील
**<u>चित्रीकरणाचे दरात वाढ करण्याबाबत</u>**

**महाराष्ट्र शासन**
महसूल व वन विभाग,
शासन निर्णय क्रमांक : डब्ल्यूएलपी १०-११/प्र.क्र. २७९/फ-१,
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.
दिनांक :- २३ जानेवारी, २०१२.

**वाचा :-** १. शासन निर्णय, महसूल व वन विभाग, डब्ल्यूएलपी १०-२००० / प्र. क्र.६२/फ-१, दि. ३१.०८.२०००.

२. शासन निर्णय, महसूल व वन विभाग, डब्ल्यूएलपी १०-०६/ प्र. क्र.३२०/फ-१, दि. ०२.०१.२००७

३. प्रधान मुख्य वनसंरक्षक, महाराष्ट्र राज्य, नागपूर यांचे पत्र क्रमांक कक्ष - २२ (७) /१२२२/ २०११-१२, नागपूर, दिनांक १९.०६.२०११.

**<u>प्रस्तावना :-</u>**

संजय गांधी राष्ट्रीय उद्यान बोरीवली येथे शासन निर्णय दिनांक ३१.०८.२००० नुसार चित्रीकरणाचे दर आकारण्यात येत आहेत. त्याच प्रमाणे दिनांक ०२.०१.२००७ चे शासन निर्णयानुसार संजय गांधी राष्ट्रीय उद्यान व्यतिरीक्त इतर संरक्षीत क्षेत्रात चित्रीकरणाकरिता दिनांक ३१.०८.२००० चे शासन निर्णयमधील २-अ अनुसार (सर्वसाधारण जागेकरिता) चित्रीकरणाचे दर आकारण्यात येतात.

सबब संजय गांधी राष्ट्रीय उद्यानातील चित्रीकरणाचे दर हे १० वर्षापुर्वीचे आहेत त्या अनुषंगाने दरात वाढ करणे प्रस्तावित आहे.

**<u>शासन निर्णय :-</u>**

प्रस्तावनेतील विवेचनाच्या अनुषंगाने संजय गांधी राष्ट्रीय उद्यानातील चित्री करणाचे दरात खालीलप्रमाणे वाढ करण्यात येत आहे :-

| अ. क्र. | तपशिल | सध्याचे प्रचलित दर रुपये (मुळ रक्कम) | सुधारीत दर रुपये (सुधारित रक्कम) |
| --- | --- | --- | --- |
| शासन निर्णय क्रमांक डब्लुएलपी- १०.२०००/ प्र.क्र६२/फ-१ दिनांक ३१/०८/२००० अन्वये प्रचलीत दर दिनांक ०१.०९.२००० पासून लागु करण्यात आले. | | | |
| १ | चलचित्रीकरणासाठी अनामत रक्कम | रु.१०,०००/- (सुर्योदय ते सुर्यास्त) | रु.१०,०००/- (सुर्योदय ते सुर्यास्त) |
| २ | अ) उद्यानातील सर्वसाधारण जागेवर चित्रीकरणाचा दर | रु. १५,०००/- (सुर्योदय ते सुर्यास्त) कृष्णगिरी उपवन, मॅफको ते कान्हेरी पर्यंत | रु. २५,०००/- (सुर्योदय ते सुर्यास्त) कृष्णगिरी उपवन, मॅफको ते कान्हेरी पर्यंत |
| | ब) उद्यानातील विशिष्ट ठिकाणी करण्यात येणाऱ्या चित्रीकरणासाठी दर | | |
| | १) मिनी ट्रेन | रु. ३०,०००/- | रु.४५,०००/- |
| | २) सिंह / व्याघ्र विहार | रु. २५,०००/- | रु.४०,०००/- |
| | ३) रोपवाटीका, गांधी मंदिर | रु. १५,०००/- | रु.२५,०००/- |

| | | |
|---|---|---|
| व्हीडीओ कॅमेरा व्यावसायिकांसाठी | रु. ५,०००/- | रु.७,५००/- |
| व्यावसायिकांसाठी स्थिर चित्रण | रु. ५००/- | रु.१,०००/- |

संजय गांधी राष्ट्रीय उद्यानातील चित्रीकरणाच्या दरात वाढ तसेच इतर वनक्षेत्रात व संरक्षित क्षेत्रात व्यावसायीक चित्रीकरणासाठीचे दर शासन निर्णय दिनांक ०१.०१.२००७ मधील परिच्छेद २ (**संजय गांधी राष्ट्रीय उद्यानाव्यतिरिक्त इतर ठिकाणी चलचित्रिकरणासाठी उद्यानातील सर्वसाधारण** जागेवरील चित्रिकरणाचा दर (**वरील २-अ**) **प्रमाणे लागू करण्यात यावा.**) नुसार तसेच चित्रीकरणाचा दर दरवर्षी ५ टक्याने वाढ करण्याबाबतचे अधिकार त्या क्षेत्राचे संरक्षीत क्षेत्रव्यवस्थापक यांना प्रदान करण्यात येत आहेत.

सदरची दरवाढ ही दिनांक १ फेब्रुवारी, २०१२ रोजी पासून लागु करण्यात येत आहे.

हा शासन निर्णय वित्त विभागाने अनौपचारिक संदर्भ क्र.१०/१२/व्यय-१०, दि.११.१.२०१२ अन्वये दिलेल्या सहमतीस अनुलक्षून निर्गमित करण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**(विजय सूर्यवंशी)**
विशेष कार्य अधिकारी,
महसूल व वन विभाग.

**प्रति,**

१. प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन बल प्रमुख), महाराष्ट्र राज्य, नागपूर.
२. प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन्यजीव), महाराष्ट्र राज्य, नागपूर.
३. अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन्यजीव) सर्व
४. मुख्य वनसंरक्षक व संचालक, संजय गांधी राष्ट्रीय उद्यान, बोरीवली, मुंबई
५. मुख्य वनसंरक्षक (वन्यजीव / प्रादेशिक), सर्व
६. वनसंरक्षक (प्रादेशिक), सर्व
७. उप वनसंरक्षक (प्रादेशिक / वन्यजीव), सर्व
८. उप विभागीय वन अधिकारी, सांगली / सातारा / बीड / भोर / चिपळूण
९. महालेखापाल १/२ (लेखा व अनुज्ञेयता)/(लेखापरीक्षा), मुंबई/नागपूर.
१०. वित्त विभाग (व्यय-१०), मंत्रालय, मुंबई.
११. ब-१ / फ-२ ते फ-१० कार्यासन, महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई.
१२. फ-१ कार्यासन, महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई. (निवडनस्ती).